N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** कळमनुरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/01/2026 22:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार — **Date From (दिनांक पासून):** 08/01/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 5 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2026
   **Time From (वेळेपासून):** 12:35 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/01/2026 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/01/2026 22:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय पुरवठा विभाग, कळमनुरी ,कळमनुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): VIKAS MAROTI GANWAT
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 02/10/1981
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): पोलीस अधिकारी
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822259932

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चक्रधर पंडीतराव कदम | | | 1. कालीका मंदीराचे बाजुला, कारखाना कॉलनी, बोरबन उमरखेड,उमेरखेड,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

सरकार तर्फे फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली. दिनांक 08/01/2026 मी, विकास मारुती घनवट, वय 44 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं.9822259932 सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, आक्टोबर 2024 पासून पोलीस उप अधीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे. मी दिनांक 09.12.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार आशीत अशोकराव आवटे, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. खरवड, ता. कळमनुरी, जि.हिंगोली यांनी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी माझे आई- वडील, पत्नी एक मुलगा व एक मुलगी यांचेसह राहतो. मला एक भाउ नामे महेंद्र अशोकराव आवटे हा असुन तो वेगळा राहतो. मी रोजमजुरीचे काम करतो.

मी व माझा भाउ महेंद्र याने दिनांक 18.09.2022 रोजी माझे व त्याचे कुंटूबियाचे सदस्याची नावे शिधापत्रीकेमध्ये समाविष्ट करुन बी.पी.एल. योजना अंतर्गत अन्न धान्याचा लाभ मिळण्याकरीता मा.तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे अर्ज दाखल केले होते. त्यानंतर सदर अर्जावरुन आमचे दोघांचे कुंटूबियाच्या सदस्याची ऑनलाईन मध्ये नावे येवुन माझा नविन शिधापत्रिका क्रमांक S.Q.258787 R.C.नं. 272028775320 व माझा भाउ महेंद्र याचा नविन शिधापत्रिका क्रमांक S.Q.891432 R.C. नं. 272028679367 असा मिळालेला आहे. परंतु सध्या आम्हा दोन्ही भावांना शिधापत्रीकावर स्वस्त धान्य मिळत नाही. आमचे दोन्ही भावाचे शिधा पत्रिकेवर आम्हाला बी.पी.एल. योजना अंतर्गत अन्न धान्याचा लाभ मिळण्याकरीता आम्ही मा.तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय,कळमनुरी यांचेकडे वेळोवेळी अर्ज सादर केलेले आहेत. परंतु अद्याप पावेतो आम्हाला लाभ मिळालेला नाही. मी व माझ्या भावाने दिनांक 06.10.2025 रोजी मा. तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय, कळमनुरी यांचेकडे PHH मध्ये समाविष्ट करुन स्वस्त धान्य मिळवुन देणेबाबत परत अर्ज केला आहे.

दिनांक 08.12.2025 रोजी मी तहसिल कार्यालय, कळमनुरी येथील पुरवठा विभागातील, नायब तहसिलदार यांचे हाताखालील क्लर्क श्री कदम यांना जावुन भेटलो. माझे व माझे भावाचे बी.पी.एल. योजना अंतर्गत अन्न धान्याचा लाभ मिळण्याचे योजनेमध्ये नाव समाविष्ट करुन लाभ मिळण्याचा अंतिम आदेशाची प्रत मागण्यास गेलो होतो. तेव्हा श्री कदम, क्लर्क पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कळमनुरी यांनी मला माझे व माझ्या भावाचे प्रत्येकी 4,000/- रू असे दोघांचे मिळुन 8,000/- रू लाचेची मागणी केली आहे. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, आता माझेकडे पैसे नाही. मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे म्हणुन तेथुन निघुन आलो.

आज रोजी मी श्री कदम, क्लर्क पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कळमनुरी यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्यांचेशी माझी कोणतीही वैयक्तिक दुश्मनी किंवा देण्याघेण्याचा आर्थीक व्यवहार नाही. त्यांना देण्यासाठी 8,000/- रू मी माझे बचतीमधुन सोबत आणले आहेत. तरी श्री कदम, क्लर्क पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कळमनुरी यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे, अशा आशयाची तक्रार दिली होती.

सदर तक्रारी वरुन कारवाईचे अनुषगाने राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) श्री अक्षय अरूण चव्हाण, वय 28 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद- जवान, वर्ग-3, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, हिंगोली.रा.,जांभुळ धाबा,ता.मलकापुर जि. बुलढाणा, ह.मु.धनंजय जयस्वाल यांचे घरी किरायाने शिवाजी नगर, हिंगोली, 2) श्री विजय गुलाब मनाळे, वय 27 वर्षे, व्यवसाय नौकरी, लिपिक, वर्ग-3, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, हिंगोली. रा.मंगरूळ, ता.औसा,जि.लातुर ह.मु.तहसिल कार्यालयाचे पाठीमागे, साई मंदिर जवळ हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.09.12.2025 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यानंतर सदरची तक्रार कार्यालयातील संगणकावर

टकलीखीत करण्यात आली. तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली व संगणकावर टकलीखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यावेळी लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सापळा पथकातील सदस्य,पंच व तक्रारदार यांना मी थोडक्यात सुचना देवुन लाचमागणी पडताळणी कळमनुरी येथे जावुन करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही सापळा पथकासह अ◌ॅ.सी.बी.कार्यालय, हिंगोली येथुन निघुन कळमनुरी येथे अंदाजे 14.40 वा. पोहचलो. आमच्या सुचनेवरून पोह श्री मंडलीक यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. माझे सुचनेवरून पोह श्री मंडलीक यांनी व्हॉईस रेकॉर्डर अंदाजे 14.57 वा. सुरु करून तक्रारदार श्री आवटे यांचे अंगातील बनियनच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकावुन दिला. त्यानंतर तक्रारदार पंच क्र.1 श्री चव्हाण यांचे सोबत लोकसेवक कदम यांची तहसिल कार्यालय कळमनुरी येथे भेट घेण्यासाठी त्यांचे मोटर सायकलने रवाना झाले.

त्यानंतर अंदाजे 15.18 वा. तक्रारदार श्री आवटे व पंच क्र.1 श्री चव्हाण असे तक्रारदार यांचे मोटर सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोह मंडलीक यांनी तक्रारदार श्री आशीत आवटे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री आशीत आवटे व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री चव्हाण यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक कदम यांची तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात लोकसेवक कदम यांचे कॅबिनमध्ये भेट झाली. त्यावेळी लोकसेवक, कदम व तक्रारदार यांची तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण लोकसेवक कदम यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम करून देण्यासाठी एका फाईलचे 1,500/- रू प्रमाणे दोन फाईलचे 3,000/- रू लागतील असे म्हणुन पैशाची मागणी करून पैसे स्वतः कदम उद्या दिनांक 10.12.2025 रोजी स्विकारणार असल्याचे पंच क्रमांक 1 यांनी सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्याण घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी पंच क्रमांक 1 प्रमाणे हकिकत सांगीतली.

त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक कदम यांचे लाचमागणी पडताळणीचे संभाषण पंचा समक्ष ऐकले. लाचमागणी पडताळणी दरम्याण तक्रारदार श्री आवटे व त्यांचे भावाचे बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्न धान्याचा लाभ मिळण्याचे योजनेमध्ये नाव समाविष्ट करून अन्न धान्याचा अंतिम आदेशाची प्रत काढुन देण्यासाठी एका फाईलचे प्रत्येकी 1,500/- रू, प्रमाणे दोन फाईलचे 3,000/- रू. लाचेची मागणी करून, लाच रक्कम स्वतः उद्ईक दिनांक 10.12.2025 रोजी स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावरुन लोकसेवक कदम यांच्या विरुध्द सापळा कारवाई दि. 10.12.2025 रोजी करण्याचे ठरविले. सदर बाबत सापळा पथक, पंच व तक्रारदार यांना गोपनियता बाळगनेबाबत सुचना देवुन तक्रारदार यांना कळमनुरी येथे व पंच व सापळा पथक यांना अ◌ॅ.सी.बी. कार्यालय हिंगोली येथे दिनांक 10.12.2025 रोजी हजर राहणेबाबत कळविले. दिनांक 09.12.2025 रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणीचा सविस्तर तक्रार पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 10.12.2025 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक अ◌ॅ.सी.बी. कार्यालय हिंगोली येथे हजर झाल्यानंतर त्यांना सापळा कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कार्यवाहीसाठी लागणारे साहित्यासह अ◌ॅ.सी.बी. कार्यालय हिंगोली येथुन निघुन 11.20 वाजता कळमनुरी येथे पोहचलो. त्यानंतर सापळापुर्व कार्यवाही करून लोकसेवक कदम यांची तहसिल कार्यालय कळमनुरी येथे भेट घेण्यासाठी व्हॉईस रेकॉर्डर अंदाजे 11.45 वा. सुरू करून तक्रारदार श्री आवटे यांचे अंगातील बनियनच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकावुन दिला. त्यानंतर तक्रारदार पंच क्र.1 श्री चव्हाण यांचे सोबत लोकसेवक कदम यांची तहसिल कार्यालय कळमनुरी येथे भेट घेण्यासाठी त्यांचे मोटर सायकलने रवाना झाले.

त्यानंतर अंदाजे 12.08 वा. तक्रारदार श्री आवटे व पंच क्र.1 श्री चव्हाण असे तक्रारदार यांचे मोटर सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोह मंडलीक यांनी तक्रारदार श्री आशीत आवटे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री आशीत आवटे व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री चव्हाण यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक कदम यांची तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात लोकसेवक कदम यांचे कॅबिनमध्ये भेट झाली. लोकसेवक कदम यांनी तक्रारदार यांचा मोबाईल नंबर घेवून काम झाल्यानंतर फोन करून बोलवून घेतो असे म्हणाले व लाच रक्कम स्विकारली नसलेबाबत पंच क्रमांक 1 यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना सापळा कार्यवाही दरम्याण घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी पंच क्रमांक 1 प्रमाणे हकिकत सांगीतली. त्याबाबत दिनांक 10.12.2025 रोजी सविस्तर सापळा स्थगीती पंचनामा करण्यात आला. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना गोपनियतेच्या सुचना दिल्या. लोकसेवक कदम यांचा तक्रारदार यांना फोन आल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले.

त्यानंतर आज दिनांक 08.01.2026 रोजी तक्रारदार यांचा मला फोन आला व त्यांनी कळविले की, ''आज पावेतो लोकसेवक कदम यांनी त्यांना संपर्क केलेला नाही व माझे कामही झाले नाही. त्यामुळे आज मी लोकसेवक कदम यांची भेट घेण्यासाठी कळमनुरी येथे येतो आपण पुढील कार्यवाही करू'' असे सांगितले. त्यावरून सदर कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेल्या पंचाना लेखी पत्रक देवुन कार्यालयात बोलविले. त्यावरून दोन्ही पंच कार्यालयात हजर आले दोन्ही पंच व सापळा पथक अ.सी.बी. कार्यालय हिंगोली येथे हजर आल्यानंतर त्यांना सापळा कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कार्यवाहीसाठी लागणारे साहित्यासह अ.सी.बी. कार्यालय हिंगोली येथुन निघुन 12.10 वाजता कळमनुरी येथे पोहचलो. तेव्हा तक्रारदार आशीत आवटे यांना सदर ठिकाणी बोलावले असता ते त्यांचेकडील सुमो व्हॅन क्रमांक एम.एच.38 व्ही. 6196 ने तेथे हजर आले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक, कदम यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार याने लाच रक्कम स्विकारल्याबाबत ईशारा करण्याचे तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर दिनांक 10.12.2025 रोजी सापळा स्थगीती पंचनामा कारवाईवेळी ताब्यात घेतलेली अँन्थ्रॅसिनयुक्त लाचेची 3,000/- रु रक्कम पोह मडलीक यांनी लाच रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिली.

त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 12.35 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 यांच्यासोबत लोकसेवक, कदम यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडील व्हॅन क्रमांक एम.एच.38 व्ही. 6196 ने तहसिल कार्यालय, कळमनुरी येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील सदस्य असे तहसिल कार्यालय, कळमनुरी कडे शासकिय वाहनाने रवाना झालो. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील अंमलदार असे तहसिल कार्यालयाच्या परिसराच्या आवारात जावुन कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.

सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार आवटे यांनी आज दिनांक 08.01.2026 रोजी अंदाजे 13.27 वाजता आरोपी लोकसेवक कदम यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, सापळा पथकासह लोकसेवक, कदम यांना तहसिल कार्यालय कळमनुरीच्या पुरवठा विभागामध्ये जावुन ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोह/पवार यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक कदम यांना त्यांचे नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव चक्रधर पंडीतराव कदम, वय 39 वर्ष, पद - लिपीक/टंकलेखक, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, हिंगोली, रा. कालीका मंदीराचे बाजुला, कारखाना कॉलनी, बोरबन उमरखेड, ता.उमरखेड,जि. यवतमाळ असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता, अँन्थ्रॅसिन पावडर युक्त 3,000/- रु लाचेची रक्कम लोकसेवक कदम यांचे टेबलाचे उजवे बाजुचे ड्रावरमध्ये असल्याचे त्यांनी पंचा समक्ष सांगीतले. त्यावरून सदर रक्कम लोकसेवक कदम यांचे टेबलचे ड्रावरमधुन पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी आरोपी लोकसेवक, चक्रधर पंडीतराव कदम, वय 39 वर्ष, पद - लिपीक/टंकलेखक, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, हिंगोली यांनी दिनांक 09.12.2025 रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार आशीत आवटे यांना त्यांचे व त्यांचे भावाचे बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्न धान्याचा लाभ मिळण्याचे योजनेमध्ये नाव समाविष्ट करून अन्न धान्याचा लाभ मिळण्याचे अंतिम आदेशाची प्रत काढुन देण्यासाठी, एका फाईलचे 1,500/- रू. याप्रमाणे दोन फाईलचे एकुण 3,000/- रू. पंचासमक्ष लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वतः स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यावरून आज दिनांक 08.01.2026 रोजी केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक, चक्रधर पंडीतराव कदम यांनी तक्रारदार यांचे कडुन 3,000/- रु. लाचेची रक्कम पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय कळमनुरी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथील त्यांचे चेंबरमध्ये टेबलचे ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगुन स्वतः लाच रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष अंदाजे 13.27 वाजता स्विकारली.

म्हणुन माझी आरोपी लोकसेवक, चक्रधर पंडीतराव कदम, वय 39 वर्ष, पद - लिपीक/टंकलेखक, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, हिंगोली, रा. कालीका मंदीराचे बाजुला, कारखाना कॉलनी, बोरबन उमरखेड, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांच्या विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(विकास घनवट)

पोलीस उप अधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAJESH HANMANLU MALPILU
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402RH
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

08/01
विकास घनवट
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Premprakash maroti
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.[illegible]